Three days

“ Workshop on MS Office ”

**( 19TH October, 26th October and 02nd November 2018)**

ORGANIZED BY

**भारतीय विद्या भवनचे**

**सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय**

**मुन्शी नगर, अंधेरी -पश्चिम, मुंबई - ४०० ०५८.**

सरदार पटेल अभियात्रिंकी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी CCE (Center for Continuing Education) अंतर्गत कर्मचा-यांना ई-लर्निगची अधिकाधिक माहिती व्हावी हया अनुषंगाने आठवडयातील सलग तीन शुक्रवारी म्हणजेच भाग – १ साठी ( दिनांक १९ , २६ ऑक्टोबर आणि ०२ नोव्हेबर २०१८) रोजी दुपारी ०२ ते ०५ या कालावधीत भाग- २ साठी दिनांक २० व २२ नोव्हेबर २०१८ सकाळी ९ ते ५ हया कालावधीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

भाग -१ व भाग -२ मधील या कार्यशाळेत एकूण १८ शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी सहभाग घेतला. हया कार्यशाळेत M. S. Office च्या अंतर्गत M.S. Word, Excel , and Power Point संदर्भात भाग १ मध्ये श्री. व्यंकट इसलूर, कॉम्प्यूटर लॅब टेक्नेशियन (सरदार पटेल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी ) यांनी व भाग -२ मध्ये श्री संजय ज. सावंत, ग्रंथपाल, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी माहिती दिली व त्यावर कर्मचा-यांकडून प्रात्याक्षिक करुन घेतली.




.







आजच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या युगात सामोरे जाण्यासाठी हे प्रशिक्षण आवश्यक आहे असे प्रतिपादन कार्यशाळेच्या उदघाटन सोहळयात संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रियदर्शी ह. सावंत सर यांनी सांगितले हे तिन दिवसाचे प्रशिक्षण शिबीर यशस्वी करण्यासाठी टेक्युप समन्वयक डॉ.राहुल तु. दहातोंडे, कार्यक्रमाच्या समन्वयक श्रीमती व्ही. पी. जोशी, या कार्यक्रमासाठी श्री. लुईस डायस यांनी अभ्यासक्रम समन्वयक व श्रीमती समिधा वालावलकर यांनी अभ्यासक्रमाचे आयोजक म्हणून काम पाहीले.







तदनंतर दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ रोजी स्थापत्य विभागातील प्रा. स्नेहजीत कुभांर, सहाय्यक प्राध्यापक, यांनी ११ ते १ या वेळेत ICT ( Information Communication Technology) चे आजच्या प्रगत युगात असलेले ICT चे महत्व यावर मार्गदर्शन केले.



या अभ्यासक्रमाकरीता  समन्वयक श्री. लुईस पी. डायस व समन्वयक श्रीमती समिधा स. वालावलकर यांनी मेहनत घेतली.

